मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ५५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# गुटखा माफिया की पोलिस प्रशासनाचा 'मॅनेज कारोभार'?

## गुटखा जाळे पुन्हा चर्चेत; सतीश उर्फ लाला पुन्हा केंद्रस्थानी; तालुका पोलीस ठाणे व कदीम जालना ठाण्यातील कारवाई गुलदस्त्यात

**जालना । प्रतिनिधी -** खरपुडी रोडवरील गोकुळवाडी परिसरात सोमवार ( सकाळी झालेल्या पोलिस कारवाईत तब्बल तीन ते साडेतीन लाखांचा अवैध गुटखा जप्त करण्यात आला. ही कारवाई तालुका पोलीस ठाण्याच्या पथकाने केली असल्याचे पोलिस निरीक्षकांनी युवा आदर्शशी बोलतांना सांगितले. मात्र, या घटनेनंतर निर्माण झालेली अनिश्चितता आणि पोलिसांचा संशयास्पद विलंब यांनी अनेक प्रश्न निर्माण केले आहेत.

दिवस उजाडला, कारवाई झाली; पण गुन्हा दाखल झाला नाही!

सकाळी गुटखा पकडल्याची माहिती समोर आली, पण दुपारी दोन वाजेपर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता. पोलिस निरीक्षकांनी कारवाई सुरू आहे, प्रेस नोट नंतर दिली जाईल एवढेच सांगितले. मात्र रात्री उशिरापर्यंत कोणतीही अधिकृत प्रेस नोट प्रसिद्ध करण्यात आली नव्हती.

विश्वसनीय सूत्रांनुसार, जप्त केलेला गुटखा सतीश उर्फ लाला या कुख्यात गुटखा माफियाचा असल्याचे सांगितले जाते. या आधीही लाला याच्यावर अशा अनेक संशयित व्यवहारांचे आरोप आहेत.

**दुसरी कारवाई की दिशाभूल?** त्याच दिवशी कदीम जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीत देखील गुटखा जप्त झाल्याची माहिती मिळाली. मात्र तपासानंतर हा गुटखा नसून मसाला पुड्या असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे दोन्ही ठिकाणच्या घटनांवरून कुणाला वाचवण्याचा प्रयत्न झाला का, असा संशय नागरिकांत निर्माण झाला आहे.


**मॅनेज कारोभाराचा गंध - सूत्रांचा दावा**

युवा आदर्शच्या विश्वसनीय सूत्रांनुसार, दोन पोते प्रतिबंधित व दोन पोते गुटखा असा अंदाजे तीन लाखांचा माल जप्त करण्यात आला आहे. परंतु अधिकृत गुन्हा कोणत्या कलमान्वये दाखल झाला, आणि गुटखा किती किमतीचा दाखवला जाणार आहे - हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

यामुळे पोलिसांकडून मॅनेज करून दाखवा आणि वाचवा असा व्यवसायीक व्यवहार सुरु असल्याचा संशय उपस्थित होत आहे.

**इतिहासः लालाच्या गुटख्याचा अंबड प्रकरणाशी दुवा**

गेल्या वर्षी अंबड येथे साडेसहा लाखांचा गुटखा पकडला गेला होता. त्या प्रकरणात सुरुवातीला सतिश उर्फ लाला याचे नाव ऋखठ मध्ये नव्हते. मात्र,



चौकशीदरम्यान जबाबांच्या आधारे त्याचे नाव शेवटी चार्जशीटमध्ये घालण्यात आले. जबाब देणाऱ्या व्यक्तीने स्पष्ट सांगितले होते की, हा गुटखा कर्नाटकच्या सीमेतून जालना येथे आणण्यात येतो. म्हणजेच, हा सप्लाय चेन केवळ स्थानिक नसून, राज्यस्तरीय जाळ्याचा भाग आहे.

**पोलिसांचे गुटखा माफियाशी हितसंबंध?**

प्रश्न असा आहे - प्रत्येक वेळी कारवाई होते, पण नाव मात्र टाळले जाते. गुटख्याची किंमत दाखवताना कमी दाखवली जाते, जप्ती दाखवताना मिश्र माल दाखवला जातो. हे सर्व केवळ पोलिसांच्या दुर्लक्षामुळे घडते का? की काही ठिकाणी माफियाशी हितसंबंध जोडले गेले आहेत?

**गुटख्याचे दुष्परिणामः आरोग्यावर घाव**

गुटखा खाण्यामुळे दरवर्षी हजारो नागरिकांना मुखाचा, घशाचा आणि पोटाचा कर्करोग होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) अहवालानुसार, भारतात एकूण मुखकर्करोगाच्या रुग्णांपैकी जवळपास ६०% रुग्ण हे गुटखा व तंबाखू सेवन करणारे असतात. महाराष्ट्र सरकारने २०१२ मध्येच गुटखा आणि पानमसाल्यावरील बंदी लागू केली. तरीही, जालन्यातील तरुणांपर्यंत हा विषारी पदार्थ आजही खुलेआम पोहोचतो.

**शासनाची बंदी - पण नियंत्रण शून्य**

गुटखा विक्री व साठा करण्यावर संपूर्ण बंदी असतानाही पोलिस व प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात नाहीत. जप्तीचे प्रमाण वाढले आहे, पण दोषींना शिक्षा मिळण्याचे प्रमाण नगण्य आहे. हेच माफियाचे बळ आहे.

या प्रकरणाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, जालना जिल्ह्यातील गुटखा माफिया आणि काही पोलीस यांच्यातील संबंधांवर उच्चस्तरीय चौकशी आवश्यक आहे.

तरुण पिढीचे भवितव्य या गुटख्यामुळे अंधःकारात जात आहे. पोलीस अधिक्षकांनी स्वतः पुढाकार घेऊन या प्रकरणातील सत्य बाहेर आणणे हीच काळाची गरज आहे.

गुटखा हा केवळ आरोग्याचा नव्हे, तर व्यवस्थेच्या प्रामाणिकतेचा प्रश्न बनला आहे. जोपर्यंत पोलिस, प्रशासन आणि शासन यांचा सहकार्याऐवजी संगनमत संपत नाही - तोपर्यंत गुटखा माफिया लाला आणि त्याच्या सावलीतील मॅनेज कारोभार सुरूच राहणार, आणि जालना जिल्ह्याची तरुणाई गुटख्याच्या विळख्यात अडकत राहणार आहे.

युवा आदर्श

## बुजुर्ग ...

बुजुर्ग पुढारी मंडळी
विधाने विवाद ग्रस्त
चौफेर हल्ला गुल्ला
स्वताचं होतात त्रस्त
असे बोललो नव्हतो
सारवतात मद मस्त
क्वचित एखाद वेळी
जरासे होई नतमस्त
होवू लागता कडेलोट
दिलगिरी करे व्यक्त
टिका टिप्पणी मधून
होऊ पाहतात मुक्त
बोलण्याच्या ओघात
शब्द निंदा नालस्त
वादळी वारे सुटतात
बने आपसूक नेमस्त
नाही मागणार माफी
वक्तव्ये हो बिनधास्त
फोन येता दिल्लीहून
म्हणतात माझे रास्त
चमचे जमले आमचे
विधाने करती दुरुस्त
करून सवरून सारे
नेते राहतात तंदुरुस्त

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

## जालना जिल्ह्यात खतटंचाई गंभीर

आमदार खोतकर यांचा केंद्रीय मंत्र्यांकडे पाठपुरावा



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्यात शेतकऱ्यांना सध्या खरीप हंगामात युरिया आणि डी.ए.पी. खतांच्या मोठ्या तुटवड्याला सामोरे जावे लागत आहे. या गंभीर समस्येची दखल घेत आमदार अर्जुन खोतकर यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय रसायन व खते मंत्री मा. ना. श्री. जनकप्रकाश नड्डा यांची भेट घेऊन जालना जिल्यासाठी तातडीने युरिया आणि डी.ए.पी. खतांचा पुरवठा वाढवावा अशी ठाम मागणी केली. आमदार खोतकर यांनी मंत्र्यांना दिलेल्या **पान ३ वर**

## जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना तर्फे १९ वर्षाखालील मुलांची निवड चाचणी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धा होणार असून त्यासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना तर्फे १९ वर्षाखालील मुलांची जिल्हा संघ निवड चाचणी दिनांक १९ जलैंलशी रविवार २०२५ सकाळी १० वाजता साई काणे क्रिकेट अकॅडमी Astro Turf , एमआरडीए स्कूल जवळ रोहन वाडी रोड जालना येथे घेण्यात येणार आहे.

या निवड चाचणीसाठी १ सप्टेंबर २००७ या तारखेनंतर जन्मलेल्या मुलांना सहभागी होता येणार आहे इच्छुक मुलांनी साई काने क्रिकेट अकॅडमीच्या Astro Turf एमआरडीए स्कूल जवळ रोहनवाडी रोड जालना येथे १९ ऑक्टोबर २०२५ रविवार रोजी सकाळी १० वाजता उपस्थित राहावे.

या निवड चाचणी साठी उपस्थित असणाऱ्या मुलांना, जन्म प्रमाणपत्र, आधार कार्ड, टी सी, दहावीची सनद इ. च्या सत्यप्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

असे आवाहन जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना चे अध्यक्ष ॲड. नरेंद्र देशपांडे, सचिव राजू काने, अभिजीत चव्हाण आदी सदस्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

या निवड चाचणीतून निवड झालेल्या मुलांना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल सर्व खेळाडूंनी क्रिकेट पोशाखात स्वतःचे क्रिकेट साहित्यासह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे अधिक माहितीसाठी ९८२३३७३३६१ / ९९२२९३३१३८ या क्रम ांकावर संपर्क साधावा.



## संपादकीय

# ई कचऱ्याविषयी जागरूकता हवी

आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनर्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅक्चरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# राष्ट्रीय आपत्ती - शेतकऱ्यांची पराधीनता

देशा पुढील सर्वात महत्वाचा मुद्दा कोणता, असा प्रश्न विचारला तर तुम्ही काय उत्तर द्याल? कोणाला हिंदू-मुसलमानांचा प्रश्न महत्वाचा वाटेल. कोणाला ओबीसी, मराठा, पटेल, जाट, धनगर, बंजारा वा अन्य जातींचे आरक्षण महत्वाचे वाटेल. कोणाला सीमा सुरक्षेचा मुद्दा महत्वाचा वाटू शकतो. कोणाला गाजा-इस्रायल, रशिया-युक्रेन भारत-पाकिस्तान यांचे युद्ध महत्वाचे वाटेल, कोणाला पेट्रोल टंचाई तर कोणाला पाण्याचे संकट वाटेल, कोणी पर्यावरण प्रदूषणाने चिंतीत होईल, कोणाला संविधान संकटात आहे याची चिंता वाटेल. कोणी महिलांवरील अत्याचारांचा निषेध करेल. कोणाला बेरोजगारी तर कोणाला महागाई समस्या वाटेल. कोणी कोरोना संकटाने भयग्रस्त असेल तर कोणी लॉक-डाऊनने त्रस्त झाला असेल. कोणाला आरोग्याची चिंता तर कोणाला शिक्षणाचे प्रश्न अग्रक्रमाचे वाटतील पण फार थोडे लोक म्हणतील की, 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' सर्वात महत्वाचा मुद्दा आहे.

वर दिलेल्या यादीतील मुद्दे चुकीचे आहेत असे नाही. हे मुद्दे आहेतच. या शिवाय अनेक मुद्दे जोडले जाऊ शकतील. पण 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' हा महत्वाचा मुद्दा नाही का? त्याकडे डोळे झाक का करायची? डब्यांची दुरुस्ती करायची मात्र इंजिन नादुरुस्त ठेवायचे अशातला हा प्रकार आहे.

**विक्राळ रूप**

या देशात गेल्या कित्तेक वर्षात सुमारे चार-पाच लाख शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागली. जगातील कोणत्याही देशात एका व्यावसायातील एवढ्या लोकांनी आत्महत्या केलेली नाही. कोणत्याही महामारीत एवढे लोक सलगपणे दगावले नाहीत, कोणत्याही महायुद्धात एवढे सैनिक मारले गेल्याचे दिसत नाहीत. देशात दररोज चाळीस ते पन्नास व महाराष्ट्रात सहा ते आठ शेतकरी आत्महत्या करतात. शेतकरी आत्महत्यांचे हे विक्राळ रूप आपण डोळ्याआड कसे करू शकतो?

जगाचा गोल दोन हातावर तोलला आहे. एक हात स्त्रीचा आणि दुसरा शेतकऱ्यांचा आहे. जगातले सगळे शेतकरी नष्ट झाले तर खाणार काय? दगड वा लोखंड खाऊन पोट भारता येत नाही. अन्नच खावे लागते. अन्न पिकवतो शेतकरी. शेतकऱ्याशिवाय या जगाची कल्पना करता येत नाही. मानवी जीवनासाठी नितांत महत्वाचा घटक असलेला शेतकरी आपले जीव देतो आहे आपल्याला त्याचे दुख महत्वाचे वाटत नाही हा कोडगेपणा आहे की आत्मघात याचा विचार करायला हवा.

**शेतकरी आत्महत्या कधी सुरु झाल्या?**

'शेतकऱ्यांच्या आत्महत्या १९९० मध्ये सुरू झाल्या' असा खोटा प्रचार अनेक नामवंत डावे-उजवे विचारवंत करतात. खुलीकरण, जागतिकीकरण यामुळे शेतकरी आत्महत्या करू लागले, हे सिद्ध करण्याचा त्यांचा केविलवाणा खटाटोप असतो. खोट्याचा प्रचार करण्यात हल्ली त्यांनी आघाडी मारली आहे. पण सत्य हे सत्य असते. ढगा आड सूर्य लपला म्हणजे सूर्य अस्त झाला असे कोणी समजू नये. शेतकऱ्यांच्या आत्महत्या आपल्या देशात सातत्याने होत आल्या आहेत. ९०च्या नंतर नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोने शेतकरी आत्महत्यांची स्वतंत्र नोंद सुरू केली. काही बालिश, बाळबोधांना वाटते की, तेंव्हा पासूनच शेतकरी आत्महत्या सुरू झाल्या. त्या पूर्वीही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या नोंदी सापडतात.

१९ मार्च १९८६ ला यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे कुटुंबियांनी वर्ध्याच्या पावनार जवळील दत्तपूर येथे जाऊन सामूहिक आत्महत्या केली होती. (दरवर्षी १९ मार्चला किसानपुत्र उपवास करतात.) त्या वेळेस खुलीकरणाचा मागमूसही नव्हता. त्याही पूर्वीच्या आत्महत्यांचे संदर्भ खाली दिले आहेत. आत्महत्यांचा जमिनीच्या आकाराशी असलेला संदर्भ देखील अभ्यासला गेला आहे, डाव्यांच्या माहितीसाठी खास बाब म्हणजे, बंगाल मध्ये झालेल्या आत्महत्यांचा संदर्भ यात नमुद करण्यात आला आहे!

Ganapathi and Venkoba Rao analyzed suicides in parts of Tamil Nadu in 1966. They recommended that the distribution of agricultural organophosphorus compounds be restricted.25 Similarly, Nandi et al. in 1979 noted the role of freely available agricultural insecticides in suicides in rural West Bengal and suggested that their availability be regulated. 26 Hegde studied rural suicides in villages of northern Karnataka over 1962 to 1970 and stated the suicide incidence rate to be 5.7 per 100,000 population.27 Reddy, in 1993, reviewed high rates of farmer suicides in ndhra Pradesh and its relationship to farming size and productivity.28

**मूळ कारण**

शेतकरी आत्महत्या ह्या एका व्यावसायातील लोकांच्या आहेत. इतर आत्महत्यांशी त्यांची तुलना करणे चुकीचे आहे. इतर आत्महत्यांमध्ये मानसिक कारण असू शकते किंवा एखाद्या शेतकऱ्यांने आत्महत्या केली असती तर आपण त्याची मानसिक कारणे शोधली असती पण लाखालाखाने होणाऱ्या आत्महत्या पाहाता, त्याला मानसिक कारण नसून वेगळे काही तरी आहे हे मान्य करावे लागेल. विशेषत: शेतकऱ्यांच्या परिस्थितीत त्याची कारणे शोधली पाहिजेत.

खरे तर मानसिक कारण शोधणाऱ्यांची मानसिकता तपासली पाहिजे. जो बळी जातो त्याला दोषी ठरविण्याची एक चालाख मानसिकता असते. अशी मानसिकता असणारे लोक बलत्कार झालेल्या मुलीलाच म्हणतात, ती तशीच आहे. ती तसे कपडे घालते. ती तिकडे का गेली? वगैरे. बलात्कार करणाऱ्याला ते दोष देत नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत देखील अशाच प्रतिक्रिया येतात. दारू पितात, कुवती पेक्षा जास्त खर्च करतात, आदी. शब्द देखील चालाखीने 'आत्महत्या' वापरतात. आत्महत्या म्हणजे स्वत:च स्वत:ची हत्या करणे. जणू या हत्येला इतर कोणीच जबाबदार नाही. वास्तविक पाहता हे सरकार द्वारा कुनियोजीत केलेले खून आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना शेतकरी जबाबदार नसून सरकार जबाबदार आहे हे सांगण्याचे धाडस कोणी करत नाही.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या मुळाशी व्यवस्थेची रचना कारणीभूत आहे. ही रचना जाणीवपूर्वक रचण्यात आली आहे. तिचा फारसा कोणी विचार करीत नाही. हा विचार केला तर शेतकरी आत्महत्यांचा मुद्दा लक्षात यायला लागतो.

**शेतकरी शब्दाची व्याख्या ?**

शेतकरी या शब्दाची व्याख्या काय आहे? ढोबळमानाने जो शेती करतो त्याला शेतकरी म्हणतात. असे असेल तर कारखानदार कोणाला म्हणावे? जो कारखान्यात काम करतो त्याला कारखानदार म्हणावे लागेल. पण तसे म्हटले जात नाही. जो काम करतो त्याला कामगार म्हणतात. कारखान्याच्या मालकाला आपण कारखानदार म्हणतो. तो मशीनवर उभा राहून काम करीत नाही. मग शेतीच्या मालकाला आपण शेतकरी म्हणावे लागेल. ज्याच्याकडे सात-बारा आहे तो शेतकरी ही व्याख्या बरोबर आहे का? कोणताही मोठ्या पुढाऱ्याचे नाव डोळ्यासमोर आणा. त्याला आपण शेतकरी म्हणतो कि पुढारी? आमच्या भागात एका आर. टी. ओ. आहेत. त्यांच्याकडे जमिनीचा सातबारा आहे. पण आम्ही सगळे त्यांना आर. टी.ओ. म्हणूनच ओळखतो. नोकरी करणाऱ्या अनेकांकडे जमिनीचे सात-बारा आहेत. त्याना शेतकरी म्हणता येईल का?

मी केलेली शेतकरी या शब्दाची व्याख्या अशी आहे. ज्यांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे, तो शेतकरी. तुम्ही प्रत्यक्ष शेती करा अथवा करू नका. तुमच्या नावे सात-बारा असो वा नसो, तुम्ही काय करता हे महत्वाचे नसून तुमचे उत्पन्नाचे मुख्य साधन जर शेती असेल तर तुम्ही शेतकरी आहात.

कोणी पुढाऱ्यांना शेतकरी समजतो, कोणी नोकरदारांना समजतो, म्हणून गैरसमज होतो. म्हणून ज्या शेतकऱ्यांचे खरे प्रश्न आहेत त्यांची उपेक्षा होते.

भारतात ८५ टक्के शेतकऱ्यांचे धारणक्षेत्र (होल्डिंग) केवळ दोन एकर राहिले आहे. ही आकडेवारी २०११ची आहे. आज ती त्याही पेक्षा कमी झाली असणार. खिशात भांडवल म्हणून दमडी नसणाऱ्या व दोन एकर क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्याने कोणते पीक घेतले म्हणजे त्याचे निव्वळ वार्षिक उत्पन्न सव्वा दोन लाख रुपये होईल? सव्वा दोन लाख रुपये हा आकडा सरकारी कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाने ठरवला आहे. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याचे वेतन ठरवताना 'माणसा सारखे जगण्यास' आज किती पैसे लागतात, याचा हिशोब घालून हा आकडा काढण्यात आला होता. दोन एकर कोरडवाहू शेती करून पहा, मग लक्षात येईल की, कितीही पिकले आणि कितीही भाव मिळाला तरी दोन एकर शेतीत कोरडवाहू शेतकऱ्याला आपल्या कुटुंबाचा खर्च भागविणे केवळ अशक्य आहे. शेतकरी आत्महत्या का करीत आहेत हेही लक्षात येईल. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यात ९५ टक्के शेतकरी असेच आहेत की, त्याना उत्पन्नाचे दुसरे साधन नाही व त्यांचे होल्डिंग दोन एकरच्या आसपास आहे.

**शेतकऱ्यांचे जीव घेणारे कायदे-**

भांडवल नाही, दुसरा उद्योग करण्याचा पर्याय नाही. जमिनीचे क्षेत्र अत्यल्प असे शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करतात, हे वास्तव आहे. पण या कडेलोटापर्यंत हे शेतकरी आले कसे? हेही समजावून घेतले पाहिजे.

**परिशिष्ट-९** १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० रोजी घटना लागू झाली आणि १८ जून १९५१ रोजी पहिली घटनादुरुस्ती (बिघाड) करण्यात आली. घटना लागू झाल्यानंतर लगेच दीड वर्षात दुरुरुस्ती करण्यात आली. समोर सहा महिन्यावर निवडणुका येऊन ठेपल्या होत्या. वर्तमान संसद हंगामी सरकार म्हणून काम करीत होती. अजून राज्यसभा अस्तित्वात आलेली नव्हती तरी घाई-घाईने घटना दुरुस्ती केली गेली. या घटना दुरुस्तीत अनेक गोष्टी होत्या. त्या बद्दल मला काही म्हणायचे नाही पण या दुरुस्तीने घटनेच्या अनुच्छेद ३१ ए व बी मध्ये दुरुस्ती करण्यात आली. घटनेत नसलेले परिशिष्ट-९ निर्माण करण्यात आले. या दुरुस्ती नुसार असे ठरले की, परिशिष्ट-९ मध्ये सरकार जे कायदे टाकील, त्या विरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही. या कायद्याचे बिल मांडताना तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी, ही व्यवस्था केवळ पहिल्या १३ कायद्यांसाठी राहील असे संसदेत स्पष्ट केले होते परंतु त्यांच्या हयातीत (कार्यकाळात) म्हणजे १९६४ पर्यंत या परिशिष्टात ६० कायदे टाकण्यात आले होते. त्यानंतरच्या पंतप्रधानांनी सपाटाच लावला. आज घडीला परिशिष्ट-९ मध्ये २८४ कायदे आहेत. त्यापैकी सुमारे २५० कायदे केवळ शेतीशी संबंधित आहेत. याला योगायोग म्हणता येणार नाही. शेतकऱ्यांना न्यायालयात जाण्यास बंदी करणारी ही तरतूद शेतकऱ्यांच्या जीवावर बेतली.

**सीलिंग कायदा-** १९६० मध्ये सीलिंग कायदा आला. शेतकऱ्यांच्या मालमत्तेवर सरकारचे नियंत्रण लागू करणारा हा कायदा आहे. कारखानदाराने किती मालमत्ता बाळगावी, यावर कोणतेच बंधन नाही पण शेतकऱ्यांना मात्र ५४ एकर, २८ एकर व ८ एकरची मर्यादा, असा हा पक्षपात करणारा कायदा. या कायद्याने संविधानाच्या मुलभूत अधिकारांवर अतिक्रमण केले आहे. पण हा कायदा परिशिष्ट-९ मध्ये टाकल्यामुळे तो लागू राहिला. या कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या कंपन्या झाल्या नाहीत. जागाती प्रगत देशात शेतकऱ्यांच्या कंपन्या शेती करतात. आपण जागतिक स्पर्धेला तोंड देऊ शकत नाही. आपया देशात जमिनीचे विखंडन होत गेले व आज शेतकरी दोन एकर पर्यंत खाली पोचले. येत्या एक दोन पिढ्यांनी पुढे काय होईल हे सांगता येत नाही.

**आवश्यक वस्तू कायदा-** व्यवसायाचे स्वातंत्र्य या मुलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारा आवश्यक वस्तू कायदा. हा कायदा अध्यादेशाच्या स्वरूपात दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्रजांनी लागू केला होता. इंग्रज निघून गेले पण त्यांनी केलेला अध्यादेश कायम राहिला. पुढे त्याचे १९५५ साली कायद्यात रुपांतर करण्यात आले. १९७६ साली इंदिरा गांधी प्रधानमंत्री असताना हा कायदा परिशिष्ट-९ मध्ये टाकण्यात आला. या कायद्यात आवश्यक वस्तूची व्याख्या केलेली नाही. सरकार ठरवेल ती वस्तू आवश्यक वस्तू मानली जाईल असे या कायद्यात नमूद केले आहे. आज घडीला सुमारे दोन हजार वस्तू 'आवश्यक वस्तू' म्हणून नोंदविल्या गेल्या आहेत. या कायद्याने सरकारला भयंकर अधिकार दिले आहेत. सरकार कोणत्याही वस्तूचे उत्पादन, वाहतूक, साठवणूक, एवढेच नव्हे तर किमत नियंत्रित करू शकते. बाजार स्वातंत्र्यावरील या निर्बंधांचा सर्वाधिक वाईट परिणाम शेतकऱ्यांवर झाला. सरकारला शेतीमालाचे भाव सातात्याने पाडता आले. त्यामुळे शेतकरी देशोधडीला लागला. त्याच्याकडे बचत शिल्लक राहिली नाही. त्याला कोणत्याच संकटाला तोंड देण्याचे बळ राहिले नाही. या कायद्यांमुळे ग्रामीण औद्योगिकीकरणाला खीळ बसली. शेतकऱ्यांना मूल्यवृद्धीचा लाभ मिळू शकला नाही. किसानपुत्रांना रोजगार मिळू शकला नाही. हा कायदा लायसन्स, परमीट, कोटा राज निर्माण करणारा असल्यामुळे तो प्रशासकीय भ्रष्टाचाराची जननी मानला जातो. या कायद्याने शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान केलेच आहे शिवाय देशात भ्रष्टाचार पोसण्याचे कामही याच कायद्याने केले आहे. आज जी बिघडलेली राजकीय संस्कृती दिसते त्याच्या मुलाशी हाच कायदा आहे.

**जमीन अधिग्रहण कायदा-** हा कायदा म्हणजे लटकती तलवार. या कायद्याचा वापर करून सरकारने शेतकऱ्यांची लाखो एकर जमीन काढून घेऊन ती खाजगी कारखानदार व संस्थांना दिली. त्यात कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. मालमत्तेचा मुलभूत अधिकार त्यामुळे बाधित झाला आहे.

वरील तीनही कायद्यांनी एक व्यवस्था निर्माण केली. त्यात शेतकऱ्यांना अडकवले. म्हणून त्याना आत्महत्या कराव्या लागत आहेत.

शेतकऱ्यांचा प्रश्न गरिबीचा नाही. तो गुलामीचा आहे. शेतकऱ्यांना गुलाम केल्याने शेतकऱ्यांची दुर्दशा झाली, त्याही पेक्षा त्याचे दुष्परिणाम देशाला भोगावे लागले. विविध क्षेत्रात आलेली विकृती या कायद्याचा परिणाम आहे हे जाणून घेतले पाहिजे. दारिद्र्य नसेल तर अस्मिता टोकदार होतात. त्यामुळे जाती आणि धर्माच्या मुद्द्यांना महत्व येते. निवडणुकीत पैश्याला महत्व येते. त्यामुळे राजकारणात गुंडागर्दी निर्माण होते. शेतकऱ्यांना गुलाम केल्यानेच शिक्षण, आरोग्य यंत्रणा कुचकामी झाल्या आहेत याचा ज्या दिवशी उलगडा होईल तेंव्हा शेतकरी आत्महत्यांचा मुद्दा कळीचा वाटायला लागेल. शेतकरी हा या व्यवस्थेच्या रेल्वेचा डबा नसून तो इंजिन आहे म्हणून शेतकरी आत्महत्यांवर तांतडीने विचार होणे गरजेचे आहे. शेतकरी आत्महत्या हा केवळ शेतकऱ्यांचा प्रश्न नसून ही एक राष्ट्रीय आपत्ती आहे.

**अमर हबीब,**
**किसानपुत्र आंदोलन**
**आंबाजोगाई**
**८४११९०९९०९**

**********

# दिवाळीतील आनंदाचा शिधा गेला कुठे?

दिवाळी म्हणजे वर्षातुन येणारा एक महत्त्वाचा आणि आनंदाचा सण असतो. त्याचप्रमाणे दिवाळीला सर्वत्र झगमगाट व उत्साहाचे वातावरण दिसून येते. परंतु सरकारने आनंदाचा शिधायोजनेवर ब्रेक लावल्याने गोरगरिबांच्या सणांमध्ये ब्रेक लागुन अंधकाराचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते.२०२२ पासुन सरकारने आनंदाचा शिधा हा उपक्रम राबविला होता. परंतु या उपक्रमाला आता ग्रहण लागल्याचे दिसून येते. त्यामुळे गेल्या दीड वर्षापासून दिवाळीत मिळणारा आनंदाचा शिधा सरकारने बंद करून गोरगरीब जनतेवर मोठा अन्याय केल्याचे दिसून येते.निवडणुका झाल्या आणि मुख्यमंत्री बदलला म्हणजे योजनाही बदलतात की काय असे वाटायला लागले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महायुती सरकारने २०२२ मध्ये आनंदाचा शिधाहा उपक्रम सुरू केला होता.या योजनेत केवळ १०० रूपयामध्ये एक किलो साखर, एक किलो चणाडाळ, एक लिटर खाद्यतेल व एक किलो रवा असे आवश्यक साहित्य दिले जात होते.परंतु गेल्या दीड वर्षापासून या योजनेला सरकारने खो दिला आहे.परंतु गोरगरीब लाभार्थ्यांना आताही अपेक्षा आहे की दिवाळीचा शिधा मिळेल.परंतु सध्यातरी असे वाटत नाही की सरकार लाभार्थ्यांना आनंदाचा शिधादेईल.आताही ८० टक्के शिधापत्रिकाधारक आनंदाचा शिध्याच्या प्रतीक्षेत आहेत. सरकारला समजायला पाहिजे की महागाईने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे अशा परिस्थितीत सणासुदीला सरकारने जनतेच्या जखमेवर फुंकर घालायची तर मीठ चोळण्याचे काम करतांना दिसत आहे आणि या कठीण परिस्थितीचा सामना गरीब व सर्वसामान्यांना मोठ्या प्रमाणात करावा लागतो आहे.परंतु सणासुदीच्या दिवसांत जर सरकार गरीबांचा आधार बनत नसेल तर अशा योजनांचा काय फायदा!आनंदाचा शिधा बंद केला म्हणजे राज्यात सर्वच काही ठीक आहे असे म्हणता येणार नाही.कारण राज्यातील संपूर्ण जनता राजकीय पुढाऱ्यांसारखी श्रीमंत नाहीत. अत्योदय कार्डधारक, प्राधान्य कुटुंबकार्डधारक अशाप्रकारे संपूर्ण शिधापत्रिकाधारक यांना ऐन सणासुदीच्या काळात सरकारने सुरू केलेली योजना अचानक बंद करीत असेल तर गरीबांच्या व शिधापत्रिकाधारकांच्या पायावर कुऱ्हाड मारण्याचे काम सरकार करीत आहे असेच म्हणावे लागेल.कारण राज्यात अतिवृष्टीमुळे मराठवाडा, कोकण, विदर्भासह अनेक क्षेत्र प्रभावीत झाले आहेत प्रामुख्याने ३६ जिल्ह्यापैकी ३१ जिल्हे जास्त प्रभावीत होवून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहेत. त्यांना सरकारने सर्वो तोपरी मदत करावी आणि केलीच पाहिजे.परंतु अशा कठीण प्रसंगी सरकारच्या योजनेअंतर्गत दिला जाणारा आनंदाचा शिधा शेतकऱ्यांना व शिधापत्रिकाधारकांना सरकारने ताबडतोब द्यायला हवा.यामुळे थोडा का होईना दिवाळीचा सण साजरा करण्यास मदत होईल असे मला वाटते.गोरगरीबांच्या दृष्टीकोनातून विचार केला तर महागाईच्या काळात हा शिधा दिलासा देणारा ठरत होता. शंभर रूपयात मिळणारे पॅकेज सणाचा गोडवा वाढवत असे.मात्र गणेशोत्सव, नवरात्र, दसरा संपूनही शिधा वाटप झालेला नाही आणि आता दिवाळीला सरकार शिधा वाटप करते की नाही यात मोठी शंका निर्माण होत आहे.कारण दिवाळी फक्त आठ दिवसांवर येऊन ठेपली आहेत आणि सरकारने आनंदाचा शिधा कुठे नेऊन ठेवला अजुनही कळेनासे झाले आहे.त्यामुळे आनंदाचा शिधा अधांतरी असल्याचे स्पष्ट दिसून येते.राज्यात पैशाला काहीच कमी नाही कारण राज्यातील मुठभर आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडों रूपयांची अमाप चल-अचल संपत्ती आहे. त्यांनी जर खरोखरच समाजाला मदत करण्याचे ठाणले तर अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा सहज देवु शकतात यात तिळमात्र शंका नाही.परंतु या करीता मोठे काळीज हवे परंतु ते राजकीय पुढाऱ्यांनमध्ये दिसतं नाही ही महाराष्ट्राची राजकीय पुढाऱ्यांच्या प्रती शोकांतिका म्हणावी लागेल. राजकीय पुढारी फक्त नावालाच लोकप्रतिनिधी, जनप्रतिनीधी व समाजसेवक आहेत कृतीत मात्र प्रश्नार्थक चिन्ह उपस्थित होतो.मागील दिवाळीत अंत्योदय प्राधान्य व शेतकरी कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना रेशन दुकानातुन साखर,तेल,रवा, चणाडाळ, मैदा,व पोहे देण्यात आले होते.मात्र यंदा शासनस्तरावर यांच्यासाठी कोणताही निर्णय झालेला दिसत नाही ही सुद्धा गंभीर बाब आहे. त्यामुळे सरकारला विनंती आहे की वाढती महागाई, शेतकऱ्यांवर आलेली आपतीजनक परिस्थिती या संपूर्ण गोष्टींचा विचार करून दिवाळी साजरी करण्याच्या दृष्टीने सरकारने ताबडतोब आनंदाचा शिधा वाटप सुरू केले पाहिजे.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# परवानगी शिवाय फटाके विक्री बंद करणार – महानगरपालिका सज्ज; सुरक्षा की तांत्रिकता?

## आयुक्त संतोष खांडेकर : आझाद मैदान व घोगरे स्टेडियमव्यतिरिक्त ईतर कुठेही दुकाने लावण्याला परवानगी नाही; विनापरवाना दुकान त्वरित हटवली जातील

**जालना । प्रतिनिधी -** दिवाळीच्या पहाटेपासून शहरभर फटाक्यांच्या दुकानांची हलचल वाढत असताना म हानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर यांनी ठराविक दोन जागा - आझाद मैदान आणि घोगरे स्टेडियम - शिवाय कुठल्याही ठिकाणी फटाक्यांचे दुकाने लावण्यास परवानगी देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट केले आहे. आयुक्तांच्या निदर्शनात आलेल्या तक्रारींनंतर पालिकेच्या पथकांनी परवानगीशिवाय उभारलेल्या दुकांनांवर तत्काळ कारवाई करण्याची दहशत दाखविली आहे.

**नियम, अटी आणि प्रशासनाची जबाबदारी**

महानगरपालिकेचे नियमन हे केवळ परवानग्यापुरते मर्यादित नाही - प्रत्येक दुकानासाठी रस्ता पुरेसा रुंद असणे, ठराविक अंतर राखणे, अग्निसुरक्षा साधनांची उपलब्धता आणि इमारती-मानकांचे पालन करणे अनिवार्य आहे. आयुक्तांनी सांगितले की, फक्त या अटींचे पालन करणाऱ्या ठिकाणीच दुकानं थाटण्यास परवानगी देण्यात आली आहे. यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचे संरक्षण आणि अपघात रुग्णालयात जाण्याची शक्यता कमी करण्याचे लक्ष्य आहे.

**प्रत्यक्ष धोका - एका घटनेची आठवण**

आयुक्तांनी सिंधी बाजारातील गणपती उत्सवाच्या काळात घडलेल्या एका मृत्यूप्रमाण्याच्या अपघाताचा संदर्भ देऊन सावध केले - त्या घटनेत विनापरवाना दुकानांमुळे तंह चरमावस्था निर्माण झाली होती. हा उल्लेख केवळ इतिहास नव्हे, तर वर्तमान निर्णयाचे ठोस कारण आहे - अपघाताचे परिणाम केवळ आर्थिक नव्हेतर, मानवी जिवनाला धोका निर्माण करतात.

**प्रशासनाची दृष्टी: हटवणे किंवा त्यांनी बघणे?**

आयुक्तांनी स्पष्ट केले की परवानगीशिवाय उभ्या राहिलेल्या दुकानांना तत्काळ हटवण्यात येईल आणि त्या दुकानांचे पूर्ण जबाबदारी संबंधित दुकानदारांवर राहील. तथापि प्रशासकीय अंमलबजावणी ही कीवर्ड आहे - कितपत वेगाने आणि कितपत पारदर्शकतेने कारवाई केली जाते हेच अंतिम यश ठरवेल. फक्त घोषणा करून काम होत नाही; पथके सक्रियपणे निरीक्षण, नोटीस, अटींचे काटेकोर पालन आणि आवश्यकतेनुसार तातडीचे जप्ती/दंडकारवाही करणे अपेक्षित आहे.

**कायदेशीर तळाशी काय आहे?**

फटाके (आग्नेय सामग्री) विक्री व रेग्युलेशनसाठी उपयुक्त कायदे व नियम राज्य व केंद्रीय स्तरावर असतात - परवाना, साठवण, वाहतूक आणि विक्रीचे ठिकाण या बाबींवर कडक नियम लागू होतात. संबंधित दुकानदारांनी परवाना न घेतल्यास किंवा सुरक्षा म ार्गदर्शक तत्त्वे पाळली नसल्यास स्थानिक प्रशासनाकडून पोलीस कारवाई, दंड किंवा दुकाने हटवण्याचे आदेश देण्याचे अधिकार आहेत. आयुक्तांनी जाहीर केलेल्या स्थितीत प्रशासनाकडे हे अधिकार आहेत व त्यांचा वापर अपेक्षित आहे. दिवाळी हा व्यापार वाढवणारा काळ असलाच, तरीही सार्वजनिक सुरक्षा व कायदेशीर पालन हे वरचढ असायला हवे. अनेक छोटे व्यापारी आणि रोजंदारीवर अवलंबून असलेले लोक या व्यापारातून उत्पन्न मिळवतात; तरीही नियम मोडल्यास सार्वजनिक जीवितहानीची जोखीम अधिक गंभीर असते.



प्रशासनाने कारवाई करताना सूक्ष्म बुद्धीने - परंतु कटाक्षाने - लक्ष देणे आवश्यक आहे: परवानगी नसलेल्या दुकानांची योग्य पद्धतीने दखल घेतली पाहिजे, आणि त्यांच्याशी संवाद व समन्वय करण्याच्या माध्यमातून वैकल्पिक, सुरक्षित परवाना असलेली व्यवस्था सुचविता येईल. महानगर पालिका प्रशासनाने आता पथके सक्रिय करत वाढीव निरीक्षण, त्वरित नोटीस व हटवण्याची क्रिया. जागेवर अग्निसुरक्षा तपासणी करण्यात यावी. जर परवाना दिला गेला असेल तरही सुरक्षा उपाय तपासणे. सार्वजनिक जनजागृती - नागरिकांना धोक्यांविषयी जागृत करणे; फटाके सुरक्षितरीत्या हाताळण्याबाबत सूचना. विक्री-प्रवर्तकांसाठी पर्यायी जागा व मार्गदर्शन - परवाना न घेता व्यवसाय करत असलेल्या लहान व्यापार्यांसाठी तात्पुरत्या परवानग्यांचे/ नियमांचे समन्वय (जर कायदा परवानगी देतो तर) किंवा पर्यायी रोजगार उपाय. आयुक्त संतोष खांडेकर यांनी दिलेला इशारा योग्य व वेळेवर आहे; परंतु फक्त इशारा पुरेसा नाही. कारवाई पारदर्शक, नोंदणीकृत आणि कायदेशीर स्वरूपाची असावी - म्हणजेच ज्या दुकानांना हटवले जाते त्यांच्यावर नोंद आणि कायदेशीर प्रक्रियेचे पालन केले जावे. तसेच, अपघातानंतर योग्य तपास आणि दोषींवर दंडात्मक कारवाई केली गेली तरच नागरिकांचा विश्वास परत येईल.

**विनापरवाना दुकानांबद्दल तात्काळ प्रशासनाला कळवा - फोन किंवा ऑनलाईन तक्रारमार्ग वापरा.**

दिवाळीचा सण आनंदाचा असला तरी तो सुरक्षिततेच्या बळावरच टिकतो. म हानगरपालिकेचे आदेश आणि आयुक्तांच्या घोषणांमुळे शहरात विनापरवाना फटाका दुकानाविरोधात कडक कारवाईची शक्यता वाढली आहे; परंतु प्रत्यक्षात कितपत वेगाने आणि न्याय्य पद्धतीने ही कारवाई आणि नंतरची चौकशी होईल हे लक्षात घेणे गरजेचे आहे. प्रशासनाने पारदर्शक, त्वरित आणि योग्य पावले उचलली नाहीत तर अपघातांचा धोका तसेच समाजातील अविश्वास कायम राहील - त्यामुळे आता केवळ घोषणाच नव्हे; जबाबदारीची अंमलबजावणी हे महत्त्वाचे.

# नालंदा धम्मज्ञान स्पर्धा परीक्षा उत्साहात संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** नालंदा बुद्ध विहार, नागेवाडी (जि. जालना) येथे रविवारी दुपारी बारा ते दोन या वेळेत नालंदा धम्मज्ञान स्पर्धा परीक्षा मोठ्या उत्साहात पार पडली. या परीक्षेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण २५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

ही परीक्षा भिक्खू शिवली थेरो लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथावर आधारित १२०० पेक्षा अधिक प्रश्नोत्तरांवर आधारीत होती. स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये धम्माविषयीची जिज्ञासा, स्पर्धात्मक भावना आणि अध्ययनाची आवड निर्माण करणे हा होता.

परीक्षेचे मार्गदर्शन आणि आयोजन भिक्खू शिवली थेरो व भिक्खू धम्मधर थेरो यांनी केले. दोघांनीही विद्यार्थ्यांना संबोधित करताना धम्माचे शिक्षण केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक आणि नैतिक मूल्ये रुजवण्यासाठी अत्यावश्यक असल्याचे सांगितले. तसेच या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयारीची दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या धम्मज्ञान स्पर्धेच्या आयोजनात स्थानिक कार्यकर्ते आणि शिक्षकवर्गाने म ोलाचे सहकार्य केले. सदानंद तवले, प्रमोद कुमार डोंगरदिवे, निकाळजे सर, काकडे मॅडम, हिवाळे मॅडम, इंगोले सर, डावखरे सर आणि भालेराव सर यांनी पर्यवेक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. त्यांच्या संयोजनामुळे परीक्षा शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पडली.

कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरणाचे आयोजन करण्यात येणार असून, परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना लवकरच विशेष पारितोषिकांनी गौरविण्यात येणार आहे. नागेवाडी परिसरात या परीक्षेबाबत उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

या उपक्रमाद्वारे नालंदा बुद्ध विहाराने समाजातील युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये बौद्ध धम्माचे ज्ञान, अध्ययनाची आवड आणि आत्मविकासाची प्रेरणा जागविण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे.



पान १ वरुन

## जालना जिल्ह्यात ...

निवेदनात नमूद केले आहे की, जिल्यात सध्या खतांच्या कम तरतेमुळे शेतकरी मोठ्या अडचणीत आहेत. खरीप पिकांच्या वाढीसाठी युरिया आणि डी.ए.पी. खत अत्यावश्यक असून, पुरवठा अपुरा राहिल्यास उत्पादनावर परिणाम होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे केंद्र सरकारने तातडीने जालना जिल्यातील खत पुरवठा वाढवून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी त्यांची मागणी आहे.

तसेच आमदार खोतकर यांनी खत पुरवठ्याबाबत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. खत उत्पादक कंपन्यांकडून जालना जिल्यासाठी खतांचा पुरवठा रेल्वे रेक मार्फत केला जातो. मात्र रेल्वे स्थानकावर शेड नसल्याने खतांचा साठा उघड्यावर ठेवावा लागतो ज्यामुळे पावसाळ्यात खत ओलाव्याने खराब होते आणि मोठे नुकसान होते. त्यामुळे रेल्वे स्थानकावर शेड बांधण्याचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. केंद्रीय मंत्री नड्डा यांनी आमदार खोतकर यांच्या मागणीची गांभीर्याने दखल घेत तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

शेतकऱ्यांच्या अडचणींचे भान ठेवूनच ही भेट घेण्यात आली. जिल्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत खत पोहोचावे, हा आमचा प्रयत्न आहे. असल्याचे विधिमंडळ अंदाज समिती प्रमुख आ. अर्जुन खोतकर यांनी सांगितले आहे.




## दुधना नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित परतूर संस्थेस दिपस्तंभ पुरस्कार




**जालना । प्रतिनिधी -** डेनिसन्स रिसॉर्ट, कुमटा कर्नाटक या ठिकाणी महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्या आंतरराज्य प्रशिक्षण कार्यक्रमात रविवार (दि १२) रोजी दिपस्तंभ पुरस्कार २०२४-२५ सोहळा संपन्न झाला, या सोहळ्यात दुधना नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित परतूर जि जालना या संस्थेस छत्रपती संभाजीनगर, मराठवाडा विभागातील गट क्र. १ मधून दिपस्तंभ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशन चे अध्यक्ष काकासाहेब कोयटे,मुख्यकार्यकारी अधिकारी सुरेखा लवांडे,कर्नाटक पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष यांच्या हस्ते ट्राफी, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

दुधना नागरी पतसंस्थेस दिपस्तंभ पुरस्कार मिळाल्याबद्दल विजय देशमुख, दादाराव तुपकर, अभय कुलकर्णी, सचिन वाणी, सतीश निर्वळ आदींनी अभिनंदन करून भरभरून शुभेच्छा दिल्या!

विश्वसनियता, विनयशिलता आणि विनम्रता या त्रिसूत्रीवर चालणाऱ्या दुधना पतसंस्थेच्या यशाचे सर्व श्रेय खातेदार, ठेवीदार, सर्वसामान्य सभासद,हितचिंतक आणि कर्मचारी वृंद यांनाच जाते.

### मराठवाडा पदवीधर मतदार संघात एक लाख मतदार नोंदणीचे मराठवाडा शिक्षक संघाचे उद्दिष्ट

## पदवीधारकांनी मोठ्या प्रमाणात नाव नोंदणी करावी

### सुर्यकांत विश्वासराव, राजकुमार कदम यांचे आवाहन

**परळी । प्रतिनिधी** - मराठवाडा विभाग पदवीधर मतदारसंघाच्या आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीसाठी मतदारांची नाव नोंदणीची प्रक्रिया सुरु आसून मराठवाडा शिक्षक संघ पुर्ण ताकतीने या निवडणुकीत उतरणार आसून एक लाख पदवीधर मतदारांची नाव नोंदणी करण्याचे उदिष्ट पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या समोर ठेवले आहे. त्यासाठी मराठवाडा विभागातील पदवीधर आसलेले शिक्षक, प्राध्यापका सह इतर सर्व क्षेत्रात कार्यरत आसलेल्या पदवीधर कर्मचारी व पदविधारक बांधवाची मतदानासाठी नाव नोंदणी करून घ्यावी व पदविधारकांनी सुध्दा मोठ्या प्रमाणावर नाव नोंदणी करावी असे अवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी केले आहे.

याबाबत मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी दिलेली माहिती असी की,सदरील होणाऱ्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर विचार विनिमय करण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाच्या केंद्रीय कार्यकारणीची व कार्यकर्त्यांची नुकतीच व्यापक स्वरूपात ऑनलाइन बैठक शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी.एस.घाडगे व व्ही.जी.पवार यांच्या उपस्थितीत व अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांसी संवाद साधताना सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी वरील उदिष्ट समोर ठेवून मोठ्या प्रमाणावर नाव नोंदणी करून घेण्याचे अवाहन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले आहे.

नाव नोंदणी दि.१ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत करून घेण्यात येत आहे. त्यासाठी मतदार हा १ नोव्हेंबर २०२२ पुर्वीचा पदवीधर आसला पाहिजे. तहसील कार्यालयातून नमुना अर्ज क्र.१८ घ्यावयचा आहे. व तो पुर्ण माहिती भरून त्यासोबत कोणत्याही विद्यापिठाच्या पदवीचे प्रमाणपत्र अथवा शेवटच्या वर्षाच्या गुणपत्रकाची सत्यप्रत, आधार कार्ड अथवा मतदार ओळखपत्राची झेरॉक्स जोडावी व अर्जावर पासपोर्ट चिटकवावा. व सदरील अर्ज मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकारी यांच्याकडे अथवा तहसील कार्यालयात स्वतः नेहुन द्यावा व त्याची पोहच घ्यावी.असे अघाव यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

प्रसिध्दी पत्रकावर मराठवाडा शिक्षक संघाचे कोषाध्यक्ष ए.बी. औताडे,उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे,गुट्टे एस.जी.,सहसचिव पवार टी.जी.,माळी एन.जी.,रेखा साळुंखे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अशोक मस्कले,मधुकर जोंधळे, रातोळे जी.जी.,कुरेशी ए.ए.,राठोड पी.आर.,सुर्यवंशी आर,एन.,कदम व्ह.जी.,कौसल्ये जी.पी.,पाटोदेकर ए.डी.,सोळंके एन.टी.,वऱ्हाड बी.ए.,तिर्थकर एस.एस.,जमादार एफ.बी.,पाटील पी.एस.यांच्यासह जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, व्यंकटराव चिलवरवार,बसवेश्वर माने,शेरखाने जे.एस.,रमेश आंधळे,यशवंत मकरंद, हरिभाऊ भडके,हाळदे के.एम. जिल्हा सचिव गणेश आजबे, रविंद्र वाकोडे, चंद्रकांत चव्हाण, जी.व्ही.माने,विक्रम मायाचारी,संजय येळवंते,कदम एन.टी.,ढेंगळे व्ही.एस.,दिनेश पाटील आदिंची नावे आहेत.

## तुम्ही आनंदी असाल तर तुम्ही आनंद द्याल- डॉ अपर्णा अष्टपुत्रे

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** आपल्याकडे जे असते ते आपण दुसऱ्याला देत असतो या न्यायाने जे आनंदी असतात ते जगाला आनंद देतात, तुम्ही आनंदी असाल तर आनंद द्याल, क्रोधी असाल तर भांडणं कराल,दु:खी असाल तर दु:ख द्याल. छोटछोट्या गोष्टीत आनंद शोधला पाहिजे असे प्रतिपादन डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ अपर्णा अष्टपुत्रे यांनी आनंदशास्त्र, सकारात्मक मानसिकतेचा प्रवास या विषयावर बोलताना केले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद, अंकुशराव टोपे महाविद्यालय, विप्र फाउंडेशन व १०० शिक्षक क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय मानसिक आरोग्य चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते त्याचे उद्धाटन डॉ अपर्णा अष्टपुत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दादासाहेब गजहंस हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ विक्रम सारूक, डॉ संजय पाटील उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ अष्टपुत्रे म्हणाल्या की आनंद हा चॉईस आहे तो तुमच्या हातात आहे. आपल्यावर कोणत्या विचारांचा प्रभाव आहे हे ओळखता आले पाहिजे. ताणतणावातून बाहेर पडण्यासाठी ८ तासांची झोप घेतली पाहिजे, स्वतःचा शोध घेतला पाहिजे व कृतज्ञता बाळगली पाहिजे.

मानसशास्त्रज्ञ डॉ संदीप शिसोदे यांनी एकाकीपण: नव्या युगाचे मानसिक संकट या विषयावर व्याख्यान केले. यामध्ये बोलताना ते म्हणाले की मुलांशी पालकांचे भावनिक संभाषण कमी झाले आहे, मुलांना मनमोकळेपणाने बोलण्यासाठी कुटुंबात कुणीतरी असायला हवे. मुलांचा स्क्रीन टाईम चार तासांपेक्षा जास्त असेल तर ते मानसिक रुग्ण होऊ शकतात.

द्वितीय सत्रात मनोविकार तज्ज्ञ डॉ प्रकाश आंबेकर, डॉ चिन्मय बाऱ्हाळे, मानसशास्त्रज्ञ डॉ वर्षा मुळे यांच्या सोबत शिक्षकांनी प्रश्नोत्तराद्वारे संवाद साधला व मुलांच्या भावनिक व मानसिक आरोग्यावर चर्चा केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विप्र फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्रीनिवास गौड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पवन जोशी व १०० शिक्षक क्लबचे अध्यक्ष राजेभाऊ मगर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ सुजाता देवरे यांनी केले तर कार्यक्रमाची भूमिका जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ प्रमोद कुमावत यांनी मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मनिषा पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ शंकर तिकांडे यांनी मानले. कार्यक्रमाला वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ वैशाली जहागीरदार, प्रेरणा मोरे, राजाराम टकले, योगेश्वर जाधव, सय्यद अख्तर, डॉ श्रीहरी दराडे, मानसशास्त्र विभागाचे डॉ अविन अकोलकर, डॉ श्रीपत गायकवाड, डॉ विलास वरखडे, डॉ निलेश कुंभकर्ण, डॉ प्रियंका सेठीया, प्राचार्य डॉ अनंत चौधरी, शंकर शेरे यांच्यासह बळ जिल्ह्यातील शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांना सहभागाबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.



## तांबेकर यांचा सेवानिवृत्ती बद्दल गौरव



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी-** येथील जेबीके विद्यालयातील कर्मचारी दगडूबा तांबेकर हे नियत वयोमानानुसार नुकतेच सेवानिवृत्त झाले. यामुळे त्यांचा शाळा व मित्र परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी अनेकांनी तांबेकर यांच्या सेवेचा गौरव केला. आपल्या ३० वर्षाच्या सेवाकाळात शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी दिलेले प्रेम आपण कधीही विसरू शकणार नाही असे भावोद्गार यावेळी दगडूबा तांबेकर यांनी काढले. यावेळी टेंभुर्णी चे माजी सरपंच विष्णू जमधडे, नवभारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष शेख जमीर संचालक प्रा. दत्ता देशमुख, सामाजिक कार्यकर्ते जनार्दन झोरे, गणपत भिताडे, सुरेश बोर्डे, मुख्याध्यापक विष्णू जाधव, सखाराम बोरकर, संजय कुलकर्णी आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.




**जालना शहरातील राम तीर्थ पुलावरील रस्त्याची दुरावस्था झाल्या मुळे वाहतुकीची कोंडी होत असून ये जा करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.**
**(छाया/जावेद तंबोली)**

## राहत सोशल ग्रुप जालना तर्फे मुस्लिम सामूहिक विवाहाचे आयोजन

### पालकांनी त्यांच्या मुलांची नोंदणी करावी - शेख अफसर शेख

**जालना । प्रतिनिधी -** राहत सोशल ग्रुप जालना गेल्या २५ वर्षांपासून जालना जिल्ह्यात मुस्लिम सामूहिक विवाह यशस्वीरित्या आयोजित करत आहे आणि आतापर्यंत राहत सोशल ग्रुप जालना द्वारे आयोजित मुस्लिम सामूहिक विवाहात ६०० हून अधिक मुस्लिम जोडप्यांचे लग्न झाले आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही राहत सोशल ग्रुप जालना द्वारे रविवार, ७/डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता आयेशा लान्स उर्दू हायस्कूल मागे , कचेरी रोड, कदिम जालना येथे मुस्लिम सामूहिक विवाह आयोजित केले जात आहेत. या मुस्लिम सामूहिक विवाहांमध्ये ज्यांना आपल्या मुला-मुलींचे लग्न करायचे इच्छुक आहे त्यांनी २०/नोव्हेंबर २०२५ पूर्वी राहत सोशल ग्रुपकडे नोंदणी करावी. जालनातील जबाबदार व्यक्ती, शेख अफसर शेख जी, अध्यक्ष राहत सोशल ग्रुप जालना - ९४२२२१८२२०, लियाकत अली खान यासिर, संस्थांपक सचिव - ९४२२७२४२५७, सलीम यासीन खान पठाण, शेख सलीम शेख मुहम्मद इत्यादींशी आवश्यक कागदपत्रांसह संपर्क साधावा. असे आवाहन आज राहत सोशल ग्रुप जालना अध्यक्ष शेख अफसर शेख जी यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले. ते पुढे म्हणाले की, राहत सोशल ग्रुप जालना द्वारे आयोजित मुस्लिम सामूहिक विवाहांमध्ये नोंदणीसाठी मुलाचे वय २१ वर्षे आणि मुलीचे वय १८ वर्षे असणे आवश्यक आहे याची कागदपत्रे आणि प्रमाणपत्रे असणे आवश्यक आहे. या मुस्लिम सामूहिक विवाहांमध्ये, विवाहाशी संबंधित जोडप्यांना राहत सोशल ग्रुप जालना कडून त्यांच्या जीवनावश्यक वस्तू, पलंग , बिस्तर , बरतन भांडी, कपडे आणि इतर भांडी भेटवस्तू दिल्या जातील. त्यामुळे इच्छुकांनी २० नोव्हेंबर २०२५ पूर्वी राहत सोशल ग्रुप जालना, न्यू भारत ट्रेडर्स, संत गाडगेबाबा बाबा कॉम्प्लेक्स, पेट्रोल पंपासमोर, बस स्टँड रोड जालना येथील कार्यालयात संपर्क साधावा.



## विठोरे पिता - पुत्रांनी ओझरमध्ये पटकावला बर्गमन किताब

**जालना । प्रतिनिधी -** जाफराबाद येथील रहिवाशी व बुलढाणा येथे राज्य उत्पादन शुल्क विभागात दुय्यम निरीक्षक पदावर कार्यरत रमेश विठोरे यांनी ७ तास ३१ मिनिटे १० सेकंदात तिसऱ्यांदा बर्गमॅन किताब पटकावला तर त्यांचा १७ वर्षीय मुलगा प्रणव यानेही प्रथमच ऑलम्पिक डिस्टन्स बर्गमॅन (आयरन मॅन) स्पर्धा ३ तास ५० मिनिटात पूर्ण करून बर्गमॅन किताब पटकावला. पुणे जिल्ह्यातील ओझर येथे रविवारी ही स्पर्धा पार पडली. यात रमेश विठोरे यांनी ७ तास ३१ मिनिटे १० सेकंदात १.९ किमी स्विमिंग, ९० किमी सायकलिंग व तदनंतर २१.१ किमी रनिंग करत स्वतः चा वर्ष २०२२ व २०२४ मधील रेकॉर्ड मोडला. विठोरे यांनी यापूर्वी २०२२ मध्ये भीमाशंकर जवळील डिंबे डॅम येथे तर २०२४ मध्ये कोल्हापूर येथे हाच बर्गमॅन किताब पटकविला होता. तर यावर्षी जुन्नर तालुक्यातील ओझर येथे तिसऱ्यांदा बर्गमॅन आयरनमॅन किताब पटकावून हॅट्रिक केली आहे. क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगरच्या वतीने आयोजित विभागीय जलतरण क्रीडा स्पर्धेत सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालयाचा खेळाडू प्रणव विठोरे याने १५०० मीटर जलतरण स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला होता, तद्वंतर चौथ्याच दिवशी त्याने दीड किमी स्विमिंग, ४० किमी सायकलिंग व १० किमी रनिंग ३ तास ५० मिनिटात पूर्ण करून आयरन मॅन किताब मिळवून यशाला गवसणी घातली. या यशाबद्दल राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपायुक्त डॉ. पराग नवलकर, प्रभारी उपधीक्षक ईश्वर वाघ, निरीक्षक महेश बोजेवार, विकास पाटील, राहुल रोकडे, सर्वस्वी दुय्यम निरीक्षक शरद रोटे, शिवनाथ भगत, सतीश पाटील, नयना देशमुख, रणधीर गावंडे, आनंद शिंदे तसेच सिल्लोड शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब म्हस्के, सचिव राहूल म्हस्के, प्राचार्य डॉ. रमेश देशमुख, उपप्राचार्य डॉ. सुनील मेढे, विनोद हिवराळे, डॉ. श्याम सर्जे, मुख्याध्यापक रमेश मुरकुटे, शोभा शिंगणे, सुरज शिंगणे आदींनी अभिनंदन केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.